**प्रेस नोट**

भुसावळ बाजारपेठ पो. स्टे.
**दिनांक** 3/04/2026

प्रती,

--------------------------------

--------------------------------

विषय- 5,70,000/ **रुपये** किंमतीचे सोन्याचांदीचे दागीणे व रोख रुपयाची घरफोडी करणा-या आरोपीस भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन डी.बी.पथकाने दोन दिवसात आरोपीस ताब्यात घेवुन घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणल्या बाबत.

भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशनला दिनांक 30/03/2026 रोजी गु.र.नं. 159/2026 बी.एन.एस.2023 कलम 305 (अ ) 331(3),331(4), प्रमाणे फिर्यादी वसीम अहमद अब्दुल बासीद शेख रा. फातेमा कॉलनी भुसावळ यांच्या घरी दिनांक 28/03/2026 ते दिनांक 30/03/2026 वाजे दरम्यान ते त्यांचे राहते घराला कुलुप लावुन बाहेरगावी गेले होते या दरम्यान त्यांचे घरी कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरफोडी करुन त्यांचे घरातील - **5,70,000/ रुपये** किंमतीचे सोन्याचांदीचे दागीणे व रोख रुपये घरफोडी करुन चोरुन नेले बाबत फिर्याद दिल्यावरुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासाबाबत मा. पोलीस अधिक्षक जळगाव श्री. महेश्वर रेड्डी , अप्पर पोलीस अधिक्षक श्री. अशोक नखाते, उप विभागीय पोलीस अधीकारी भुसावळ भाग भुसावळ श्री. केदार बारबोले , पोलीस निरीक्षक श्री. राहुल वाघ यांचे मार्गदर्षाना प्रमाणे दाखल गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणनेबाबत सुचना देण्यात आल्याने **भुसावळ बाजारपेठ पो.स्टे.चे डी.बी.पथकातील पो. उप निरी. राजु सांगळे, पो हे कॉ 2692 विजय नेरकर, पो हे कॉ 3077 कांतीलाल केदारे, पो.कॉ. 293 योगेश माळी पो.कॉ. 272 भुषण चौधरी, पो.कॉ. 1817 अमर अढाडे पो.कॉ. 1980 दिलीप कोल्हे, पो.कॉ.2342 चंद्रकांत रायपुरकर, पो.कॉ. 3472 अक्षय कोतकर, पो.कॉ. 2053 प्रशांत सोनार,पो.कॉ. 279 जिवन कापडे , पो.कॉ.59 जावेद शहा पो.कॉ. 2820 सचिन चौधरी , पो.कॉ. 611 महेंद्र पाटील पो.कॉ. 710 हर्षल महाजन असे अज्ञात आरोपीचा शोध घेवुन माहिती काढत असतांना मा. पोलीस निरीक्षक श्री राहुल वाघ यांना गुप्त बातमीदारा कडुन सदर घरफोडी करणा-या आरोपी बाबत माहिती मिळाल्याने** त्यांनी वरील अंमलदारांना सदर माहिती कळवुन आरोपी ताब्यात घेणे बाबत आदेशीत केल्याने त्यांनी तात्काळ अमीर खान हबीब खान वय 35 रा. न्युईदगा जवळ भुसावळ यास ताब्यात घेवुन **सदर आरोपी कडे चौकशी केली असता त्याने एका विधी संघर्ष वालका सोबत सदर घरफोडी केल्याची कबुली देवुन गुन्ह्यातील गेला माला पैकी 4,99,100 रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.वरील आरोपीला मा. न्यायालयाने 3 दिवस पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास उप विभागीय पोलीस अधीकारी भुसावळ भाग भुसावळ श्री. केदार बारबोले व पोलीस निरीक्षक श्री. राहूल वाघ यांचे मार्गदर्षना प्रमाणे पो. उप निरी. राजु सांगळे करीत आहेत.**

